# मुंबई विद्यापीठ

मानव संसाधन विकस कक्ष - १

क्र. एचआरडीसी-१/आयसीडी/२०२४-२५/ ७०८

**परिपत्रक:**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, समन्वयक, सर्व उपकेंद्रे, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, संचालक, दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, वित्त व लेखा अधिकारी आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील गट 'अ' ते गट 'क' संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकेतर अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्येक वर्षाचे दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या वार्षीक कालावधीचे गोपनीय अहवाल मानव संसाधन विकास कक्षाकडे येणे अपेक्षीत आहे. परंतु अद्यापही काही अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल मानव संसाधन विकास कक्षास प्राप्त होत नाहीत, असे निदर्शनास आले आहे. गोपनीय अहवाल हे पदोन्नतीसाठी व वार्षिक वेतन वाढीसाठी महत्वाचा भाग मानला जातो.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांचे दिनांक १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च, २०२४ पासूनचे सुधारीत नमून्यातील गोपनीय अहवाल तसेच या कालावधी व्यतिरीक्त इतरही मागिल वर्षाचे गोपनीय अहवाल पदोन्नतीसाठी पदोन्नती समिती पुढे सादर करणे आवश्यक आहे, गोपनिय अहवाल प्राप्त न झाल्याने पदोन्नती अथवा वार्षिक वेतनवाढ न मिळाल्यास त्यास संबंधीत कर्मचारी/अधिकारी जबाबदार राहतील.

तसेच आपणांस असे ही कळविण्यात येते की, शिक्षकेतर अधिकारी / कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) यांचे निरीक्षणासह, नाव/पदनाम/सही शिक्यानिशी मानव संसाधन विकास कक्ष-१ कडे पाठविण्यात यावेत. प्राप्त अहवाल पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) यांच्या सही शिक्यासाठी मानव संसाधन विकास कक्षाकडून पाठविण्यात येतील. तद्वतच सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार गोपनीय अहवालांवर सह्या कराव्यात. मात्र **अपुर्ण किंवा सह्या आणि शिक्के नसलेले गोपनीय अहवाल मानव संसाधन विकास कक्षास प्राप्त झाल्यास ते संबंधित विभागाकडे परत पाठविण्यात येतील. तसेच गोपनीय अहवाल विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यास सदर कर्मचारी/अधिकारी वार्षिक वेतनवाढ रोखुन ठेवण्यात येईल तसेच पदोन्नतीसाठी पात्र धरले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

सदर परिपत्रक संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावे.

Balirams

प्रभारी कुलसचिव

दिनांक : - ०७ मे, २०२४
ठिकाण :- मुंबई – ४०० ०३२.

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, समन्वयक, सर्व उपकेंद्रे, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे संचालक, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख

स्वीय सहायक : १) कुलगुरू २) प्र-कुलगुरु ३ ) कुलसचिव ४) वित्त व लेखा अधिकारी
५) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ ६) संचालक, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र

अभिलेख कक्ष – १० (दहा प्रती)

कृ.मा.प.

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१ सचिव, मुंबई युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
२ सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ
३ सरचिटणीस, शैक्षणिक कल्याणकारी कर्मचारी संघटना
४ सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागसवर्गिय कर्मचारी संघटना
५ सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ

गट 'अ' 'ब' व 'क' साठी गोपनीय अहवालावर प्रतिवेदन अधिकारी ( Reporting Officer), पुनर्विलोकन अधिकरी (Reviewing Officer) यांच्या खालील तक्त्यानुसार स्वाक्षरी घ्याव्यात.

| गट | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | पुनर्विलोकन अधिकारी (Reviewing Officer) |
|---|---|---|
| अ आणि ब | कुलसचिव/ संचालक / अधिष्ठाता / वित्त व लेखा अधिकारी / विभाग प्रमुख | कुलगुरू |
| क | उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, स्वीय सहायक, विभाग प्रमुख, ग्रंथपाल | कुलसचिव / संचालक / अधिष्ठाता / वित्त व लेखा अधिकारी |